—: प्रेस नोट :— दिनांक : १४.०६.२०२३

| | |
|---|---|
| घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.अंकुश सुर्यभान ठाकरे, वय — ४२ वर्षे, पद — सहायक अभियंता, कार्यालय महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्या. मोर्शी विभाग ग्रामीण क्रं.२, ता. मोर्शी जि. अमरावती. वर्ग — २ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १५,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५,०००/— रूपये |
| घटनास्थळ | आ.लो.से.सहायक अभियंता श्री.ठाकरे यांचे कॅबिन मध्ये, म.रा.वि.वि.कं. मर्या. मोर्शी विभाग ग्रामीण क्रं.२ |
| घटना तारीख व वेळ | दि.१४/०६/२०२३ चे अंदाजे १७.५१ वा. ते १८.१० वा.दरम्यान |

**थोडक्यात माहिती** :— यातील तक्रारदार यांचे मालकीचे असलेले घरगुती वापराचे विज मिटर हे व्यवसायीक वापराकरीता रुपांतरीत करुन देण्यासाठी सहायक अभियंता अंकुश ठाकरे हे २०,०००/— रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी सविस्तर तक्रार दिली होती.

**सदर तक्रारीवरुन** दिनांक १४/०६/२०२३ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान यातील लोकसेवक श्री.अंकुश सुर्यभान ठाकरे वय—४२ वर्ष, पद—सहायक अभियंता म.रा.वि.वि.क.मर्या मोर्शी ग्रामीण २, यांनी तक्रारदार यांचे मालकीचे असलेले घरगुती वापराचे विज मिटर हे व्यवसायीक वापराकरीता रुपांतरीत तडजोडीअंती १५,०००/— रूपये लाचेची मागणी करून स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले व लगेच आयोजीत करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री. अंकुश सुर्यभान ठाकरे यांनी तक्रारदार यांचेकडून १५,०००/— रूपये लाचेची रक्कम त्यांचे कक्षामध्ये स्विकारल्याने लोकसेवक श्री.ठाकरे यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेण्यात आले. तसेच त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन मोर्शी जिल्हा अमरावती ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री. मारूती जगताप सा., अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री.देविदास घेवारे सा., घटक प्रमुख श्री.शिवलाल भगत सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.अमोल कडु, पोलीस निरिक्षक श्री.योगेशकुमार दंदे व पो.कर्मचारी श्री.शैलेश कडु, आशिष जांभोळे व चालक सतिष किटुकले सर्व ला.प्र. वि.अमरावती यांनी पार पाडली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** :— अॅन्टी करप्शन ब्युरो, ललित सेंटर, परांजपे कॉलनी, कॅम्प, अमरावती.
टोल फ्री नंबर — १०६४ दुरध्वनी क्रमांक — ०७२१—२५५२३५५,२५५३०५५.

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती सत्यमेव जयते

( अमोल कडु )
पोलीस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती.

Scanned with CamScanner